# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरा अंतर्गत विविध चौकांमध्ये कोल्ड प्लास्टीक पेंट ने रोड
**{वाहतूक विभाग}** मार्कींग करण्याच्या कामा करीता रुपये ४९,९९,४१८/- (रु. एकोणपन्नास लक्ष नव्यांन्नव हजार चारशे अठरा फक्त) राशीचे प्राकलनास पद क्र. A२२५०१५३०८२० अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई — निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. या कामास्तव रु. ४९,९९,४१८/- रक्कमेला मा. अधिक्षक अभियंता यांनी SE/PWD/T.S/२२५/२०२२-२३ दिनांक २१.०९.२०२२ अन्वये तात्रिक मान्यता प्रदान केली आहे.
२. सदर प्राकलन वर्ष (२०२१-२०२२) म.न.पा. नागपूर यांचे CSR दरावर आधारीत आहे.
३. उपरोक्त प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर रितसर निविदा मागवून काम करण्यात येईल
४. सविस्त टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 133/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 02/11/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, वाहतूक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरा अंतर्गत विविध चौकांमध्ये कोल्ड प्लास्टीक पेंट ने रोड मार्कींग करण्याच्या कामा करीता रुपये ४९,९९,४१८/- (रु. एकोणपन्नास लक्ष नव्यांन्नव हजार चारशे अठरा फक्त) राशीचे प्राकलनास पद क्र. A२२५०१५३०८२० अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई — निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**